26 JUL 2026
सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ एसयूके-आरडीएफ आणि हुबळी येथील देशपांडे एज्युकेशनल ट्रस्ट यांच्यात कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांच्या प्रमुख उपस्थितीत सामंजस्य करार झाला. कराराच्या प्रतींचे हस्तांतरण करताना कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आणि एम. एन. नायक. यावेळी शेजारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव.

# शिवाजी विद्यापीठ करणार विद्यार्थ्यांचा 'कौशल्य विकास'

## हुबळीच्या ट्रस्टसमवेत सामंजस्य करार

कोल्हापूर, ता. २५ : विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकास, रोजगार क्षमता आणि उद्योगाभिमुख प्रशिक्षणाला चालना देण्याच्या उद्देशाने शिवाजी विद्यापीठाच्या सेक्शन-८ कंपनी एसयूके रिसर्च अँड डेव्हलपमेंट फाउंडेशन आणि देशपांडे एज्युकेशनल ट्रस्ट हुबळी (कर्नाटक) यांच्यात त्रिपक्षीय सामंजस्य करार झाला. कुलगुरू डॉ. आर. के. कामत, देशपांडे एज्युकेशनल ट्रस्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी एम. एन. नायक प्रमुख उपस्थित होते.

देशपांडे एज्युकेशनल ट्रस्टचा 'देशपांडे स्किलिंग' हा महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. ग्रामीण व निमशहरी भागातील युवकांना रोजगाराच्या अधिकाधिक संधी देण्याच्या उद्देशाने या संस्थेतर्फे उद्योगाभिमुख कौशल्य प्रशिक्षण दिले जाते, असे नायक यांनी सांगितले. करारावर श्री. नायक आणि कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी स्वाक्षरी केल्या. प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, संचालक डॉ. सागर डेळेकर, रवी चव्हाण, एम. बी. शेख उपस्थित होते.

### रोजगाराच्या नव्या संधी मिळतील

या सामंजस्य करारामुळे विद्यार्थ्यांना उद्योगाच्या बदलत्या गरजांनुसार कौशल्ये आत्मसात करण्याची संधी मिळणार आहे. विद्यापीठाच्या 'कुशल, सक्षम आणि उद्योगसज्ज मनुष्यबळ निर्मिती' या उद्दिष्टाला निश्चितच बळकटी मिळेल. विशेषतः ग्रामीण व निमशहरी भागातील विद्यार्थ्यांना रोजगाराच्या नव्या संधी देण्यासाठी हा करार महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल, असे कुलगुरू डॉ. कामत यांनी सांगितले.

26 JUL 2026
सकाळ

# गोविंदराव टेंबे महाराष्ट्राचे उपेक्षित साहित्यिक : सुधीर पोटे

## विद्यापीठाच्या मराठी विभागात व्याख्यान



ज्येष्ठ गायक सुधीर पोटे

कोल्हापूर, ता. २५ : 'गोविंदराव टेंबे हे महाराष्ट्राचे उपेक्षित साहित्यिक आहेत,' असे प्रतिपादन ज्येष्ठ गायक व संगीततज्ज्ञ सुधीर पोटे यांनी आज केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागात 'गोविंदराव टेंबे कार्यकर्तृत्व' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे होते. गोविंदराव टेंबे यांनी मराठीत पहिल्यांदा लक्षण गीतांची निर्मिती केली. तसेच त्यांनी स्वतंत्र स्वररागदारी निर्माण केल्या. भारतीय सांगीतिक परंपरेत टेंबे यांचे मोलाचे योगदान आहे. ही गीते आणि रागदारीच्या माध्यमातून त्यांनी संगीताबरोबरच साहित्यसेवाही केली आहे. त्याची अपेक्षित दखल घेतली नाही. टेंबे यांच्या या योगदानाचा नव्याने अभ्यास करण्याची आवश्यकता असल्याचे पोटे यांनी सांगितले. कोल्हापूरचा सांगीतिक-सांस्कृतिक दस्तऐवज म्हणून गोविंदराव टेंबे यांच्या योगदानाकडे पाहायला हवे. कोल्हापूरच्या कलाक्षेत्राची ओळख गोविंदराव टेंबे यांनी सर्वदूर पसरवली, असे डॉ. शिंदे यांनी सांगितले. डॉ. सुखदेव एकल यांनी प्रास्ताविक केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. अमोल देशमुख यांनी आभार मानले.

2 6 JUL 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गोविंदराव टेंबे महाराष्ट्राचे उपेक्षित साहित्यिक : सुधीर पोटे

कोल्हापूर : गोविंदराव टेंबे हे महाराष्ट्राचे 'उपेक्षित साहित्यिक' आहेत, असे प्रतिपादन ज्येष्ठ गायक व संगीततज्ज्ञ सुधीर पोटे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागात 'गोविंदराव टेंबे कार्यकर्तृत्व' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे होते.

अध्यक्षीय मनोगतात डॉ. रणधीर शिंदे म्हणाले, कोल्हापूरचा सांगितिक-सांसकृतिक दस्तऐवज म्हणून गोविंदराव टेंबे यांच्या कार्याकडे, योगदानाकडे पाहायला हवे.

यावेळी डॉ. सुखदेव एकल यांनी प्रास्ताविक केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. अमोल देशमुख यांनी आभार मानले. कार्यक्रमाला मराठी अधिविभागातील संशोधक विद्यार्थी आणि एम. ए. चे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

26 JUL 2026

जनप्रवास

# ‘स्व. वसंतराव दत्तवाडे यांची पत्रकारिता’ या विषयावर उद्या विद्यापीठात व्याख्यान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या वतीने सोमवार २७ जुलै रोजी सकाळी ११ वाजता दैनिक महासत्ताचे संपादक स्व. वसंतराव दत्तवाडे यांची पत्रकारिता या विषयावर इचलकरंजी येथील ज्येष्ठ संपादक प्रसाद कुलकर्णी यांचे विशेष व्याख्यान आयोजित केले आहे. वसंतराव दत्तवाडे यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या कार्यकर्तृत्वाची माहिती व्हावी, या उद्देशाने व्याख्यानाचे आयोजन केले आहे.

2 6 JUL 2026

तरुण भारत

# 'संविधान जागर'ची आज वर्षपूर्ती

**कोल्हापूर :** भारतीय संविधानाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र आणि जनसंपर्क कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने 'संविधान जागर' ही वार्षिक व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली आहे.

गतवर्षी दि. २६ ऑगस्ट २०२५ पासून दर महिन्याच्या २६ तारखेला सकाळी ११ वाजता व्याख्यानमालेचे आयोजन केले जाते. या व्याख्यानमालेअंतर्गत तज्ज्ञ अभ्यासक, विचारवंत यांचे व्याख्यान शिवाजी विद्यापीठाच्या 'शिव-वार्ता' या युट्यूब वाहिनीद्वारे ऑनलाईन स्वरुपात प्रसारित करण्यात आले आहे. 'संविधान जागर' व्याख्यानमालेअंतर्गत शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक वंचितता व समावेशन केंद्रातील डॉ. किशोर खिलारे बारावे पुष्प गुंफणार आहेत. 'वंचितांचे हितरक्षण करणारे संविधान' या विषयावर ते मार्गदर्शन करणार आहेत.